कौ. हिं.म. सं. का.अर्ज क्र.२२/२०२५
सौ. प्रियंका धीरज गवई+ १ वि. धीरज गवई+3
सी .एन .आर. क्र.MHBU060006392025
निशाणी क्र.०५ खालील आदेश

## निशाणी क्र.०५ खालील आदेश

अर्जदारांनी सदरचा अर्ज कलम २३ कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा,२००५,अन्वये गैरअर्जदारा कडून अंतरिम तात्पुरती पोटगी रक्कम रुपये १५,०००/-दरमहा दोघांकरिता, मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

**२.** अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे असे आहे की,अर्जदारा.क्र.१ चा लग्न गैरअर्जदार. क्र.१ सोबत दिनांक १२/०३/२०२३ रोजी जातीचे पारंपरिक रितीरिवाजाप्रमाणे पिंप्री गवळी, खामगाव येथे संपन्न झाला होता. अर्जदाराचे आई-वडिलांनी लग्नात हुंडा तसेच सोन्याचे दागिने देऊन लग्न थाटात संपन्न केला होता.

**३.** लग्न झाल्यानंतर अर्जदारा.क्र.१,ही गैरअर्जदारा सोबत गैरअर्जदाराच्या घरी, पांग्रा, पो. उमरा, ता. पातुर, जिल्हा. अकोला येथे नांदण्यास गेली, त्यावेळेस इतर सर्व गैरअर्जदारा त्याच घरामध्ये राहत होते. गैरहर्जदार. क्र.१ हा लग्नाच्या वेळेस ग्रामीण कुटा फायनान्स कंपनी बुलढाणा येथे नोकरीच असताना तो बुलढाणा येथे राहत होता आणि अर्जदाराला त्याच्या गावी पांग्रा येथे राहण्यास लावत होता. त्यामुळे इतर गैरअर्जदार हे अर्जदाराला वेगवेगळ्या प्रकारे त्रास देत होते.गैरअर्जदारांनी सुरुवातीपासून अर्जदाराला चांगले नांदविले नाही व

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH Date: 2026.03.16 11:34:17 +0530

इतर छोटे छोटे घरगुती कारणावरून अर्जदाराला त्रास देत होते. गैरअर्जदार क्रमांक.१ चा विवाहबाहय जेठांनी सोबत संबंध असल्यामुळे गैरअर्जदार हा अर्जदाराला शारीरिक व मानसिक त्रास देत होता आणि अर्जदाराला फारकत दे, मला तू आवडत नाही असे, म्हणून त्रास देत होता. तरी सुद्धा अर्जदार सर्व त्रास सहन करून गैरअर्जदारासोबत संसार करत होती. दरम्यानच्या काळामध्ये अर्जदार ही गर्भवती झाली आणि तिने विवाह संबंधातून प्रतीक्षा अर्जदार .क्र.२ ला जन्म दिला.

**४.** अर्जदाराने पुढे असे कथन केले की, मुलगी झाली या कारणावरून ही सर्व गैरअर्जदार हे अर्जदाराला वेगवेगळ्या पद्धतीने त्रास देत होते. दिनांक.०८.११.२०२४ रोजीगैरअर्जदारांनी दिवाळीच्या वेळेस अर्जदाराचे आई-वडिलांना पांग्रा येथे बोलवले आणि अर्जदाराचे सर्व दागिने जबरदस्तीने काढून घेतले आणि तिला मुलीसह तिच्या आई-वडिलांसोबत पाठवून दिले. अर्जदाराने गैरअर्जदारांच्या विरुद्ध महिला तक्रार निवारण कक्ष, शहर पोलीस खामगाव येथे तक्रार दाखल केली होती तसेच कौटुंबिक हिंसाचार, अंतर्गत अर्ज दाखल केले. परंतु गैरअर्जदाराने अर्जदाराला नांदवण्यास घेऊन गेला नाही.त्यामुळे अर्जदार तिच्या मुलीसह माहेरी राहत आहे.म्हणून अर्जदार दिनांक ०८/११/२०२४ पासून तिच्या आई-वडिलांच्या घरी आश्रय घेऊन राहत आहे.

**५.** अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, जेव्हापासून ती तिच्या माहेरी राहते, तेव्हापासून गैरअर्जदाराने तिला उदरनिर्वासाठी

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH Date: 2026.03.16 11:34:24 +0530

कोणतीही पोटगी दिली नाही, तसेच मुलीच्या पालन पोषण साठी कोणतीही व्यवस्था केली नाही. अर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, गैरअर्जदार हा कंपनी बुलढाणा येथे नोकरीस असून त्याला दरमहा ३०,००० /- पगार मिळतो. त्याचे गैरअर्जदाराकडे संयुक्त कुटुंबाची दोन एकर बागायती शेती मैजे पांग्रा, पो. उमरा, ता. पातुर, जिल्हा. अकोला येथे आहे आणि त्यापासून गैरअर्जदाराला वार्षिक उत्पन्न सुमारे २,०००००/- ते २,५०,०००/- मिळते . गैरअर्जदारावर कोणीही अवलंबून नाही .त्यामुळे अर्जदाराने विनंती केली की,गैरअर्जदाराकडून अंतरिम तात्पुरती पोटगी रक्कम रुपये १५,०००/- दरमहा दोघांना,देण्याचा आदेश पारित करण्यात यावे अशी ही विनंती केली आहे.

**६.** गैरअर्जदार या खटल्यामध्ये हजर झाले,त्यांनी मूळ अर्जावर तसेच अंतरिम पोटगीच्या अर्जावर त्यांचे म्हणणे निशाणी क्रमांक.१२ वर दाखल केलेले आहे.गैरअर्जदाराने, अर्जदारासोबत आपले पत्नी आणि मुलीसोबत नाते मान्य केलेले आहे. तसेच तिच्यासोबत गैरअर्जदारा.क्र.१ चे लग्न झाल्याचे मान्य केलेले आहे. परंतु गैरअर्जदाराने, अर्जदाराचे अर्जामधले इतर सर्व कथने नाकारलेले आहेत.

**७.** गैरअर्जदाराने पुढे त्यांचे असे कथन केले आहे की, अर्जदार ही कधीच गैरअर्जदारा सोबत चांगल्या पद्धतीने नांदली नाही. गैरअर्जदाराने, अर्जदाराला कधीही कोणत्याही पद्धतीचा त्रास दिलेला नाही.अर्जदाराचा स्वभाव संशयीचा असल्यामुळे ती सतत गैरअर्जदारावर संशय घेत होती. अर्जदार विनाकारण गैरअर्जदारावर संशय घेऊन भांडण

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH Date: 2026.03.16 11:34:32 +0530

करत होती. गैरअर्जदाराने तिला नांदवण्याकरिता अनेक प्रयत्न केले परंतु अर्जदार नांदवण्याकरिता आली नाही.

**८.** गैरअर्जदाराने पुढे त्यांचे असे कथन केले आहे की, गैरअर्जदार हा खाजगी कंपनीमध्ये नोकरी करतो, त्यापासून त्याला दरमहा १०,००० /- पगार मिळतो, त्यातून तो स्वतःचा, वृद्ध वडिलांचा आणि त्यांच्या औषधोपचाराचा खर्च करतो, त्यामुळे त्याच्याकडे कोणतीही रक्कम शिल्लक राहत नाही.त्यामुळे तो अर्जदारांना पोटगीची रक्कम देण्यास समर्थ आहे. गैरअर्जदाराने त्याच्याकडे शेती असल्याचे नाकारले आहेअर्जदाराने केलेला अर्ज खोटा आहे. म्हणून सदरचा अर्ज खारीज होण्यास विनंती करीत आहे.

**९.** अर्जदाराच्या तसेच गैरअर्जदाराचा बाजूचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

**१०.** कलम २३ कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा,२००५, मध्ये अंतरिम आणि माजी आदेश पारित करण्याची तरतूद आहे.सदरचा कायदा खालील प्रमाणे आहे.

**२३. अंतरिम आणि माजी आदेश मंजूर करण्याचा अधिकार :**

(१) या कायद्यांतर्गत त्याच्यापुढे कोणत्याही कार्यवाहीमध्ये, दंडाधिकारी त्याला न्याय्य आणि योग्य वाटेल असा अंतरिम आदेश देऊ शकतात.

(२) जर मॅजिस्ट्रेट समाधानी असेल की एखाद्या अर्जाने प्रथमदर्शनी हे उघड केले की प्रतिवादी हिंसाचाराचे कृत्य करत आहे, किंवा त्यांनी घरगुती हिंसाचाराचे कृत्य केले

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH
Date: 2026.03.16 11:34:39 +0530

आहे किंवा प्रतिवादीने घरगुती हिंसाचाराचे कृत्य करेल अशी शक्यता आहे, तर तो त्यावर पूर्वपक्ष आदेश देऊ शकतो. प्रतिवादीविरुद्ध कलम १८, कलम १९, कलम २०, कलम २१ किंवा यथास्थिती, कलम २२ अंतर्गत पीडित व्यक्तीच्या अशा स्वरूपातील प्रतिज्ञापत्राचा आधार.

**११.** अर्जदाराने तिचा असेट अँड लायबिलिटी चे प्रतिज्ञापत्र निशाणी क्रमांक.४ वर दाखल केलेला आहे. वर नमूद सर्व बाबीचे अवलोकन केले असता,ही बाब दिसून येते की,अर्जदार ही सध्या तिच्या आई-वडिलांच्या घरी आश्रय घेऊन राहत आहे. अभिलेखावर ही बाब समोर आलेली आहे की, गैरअर्जदाराने जेव्हापासून अर्जदार तिच्या आई-वडिलांकडे राहात आहे तेव्हापासून तिच्या उदरनिर्वासाठी कोणतीही व्यवस्था केलेली नाही. तसेच मुलीच्या पालन पोषणचे खर्चासाठी कोणतीही व्यवस्था केली नाही.

**१२.** अर्जदार हे, गैरअर्जदाराचे पत्नी आणि मुलगी असल्यामुळे, गैरअर्जदारावर अर्जदारांची नैतिक तसेच कायद्याप्रमाणे जबाबदारी आहे की, त्याने अर्जदारांचा नियमित चांगल्या पद्धतीने पालनपोषण केले पाहिजे. एखाद्या वैवाहिक इस्त्रीला बोलायचे नाही, किंवा तिच्याकडे लक्ष द्यायचे नाही, व तिला कोणताही उदरनिर्वाह द्यायचा नाही, तसेच त्या महिलेला पतीच्या घरी नाण्याकरिता घेऊन जायचे नाही व माहेरी तिच्या आई-वडिलांच्या घरी भेटायला यायचे नाही व तिच्यासोबत बोलायचे नाही आणि महिलेसोबत वैवाहिक संबंध ठेवायचे नाही. या सर्व गोष्टी करणे म्हणजेच एक प्रकारचा मानसिक त्रास देणे आहे, आणि हाच मानसिक त्रासची व्याख्या कलम ०३ घरगुती हिंसाचार, कौटुंबिक

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH
Date: 2026.03.16 11:34:46 +0530

हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा,२००५, मध्ये केलेली आहे.

**१३.** वर नमूद सर्व बाबी अर्जदारासोबत गैरअर्जदाराने केल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे सकृतदर्शनी ही बाब समोर आली आहे की, गैरअर्जदाराने अर्जदारावर घरगुती हिंसाचाराचे कृत्य केले. म्हणून अर्जदार ही तिच्या अर्जामध्ये नमूद केलेल्या प्रार्थना अनुसार मागणी घेण्यास पात्र आहे, या मताशी मी येत आहे.

**१४.** अर्जदारांची अशी मागणी आहे की, तिला गैरअर्जदारा पासून दरमहा अंतरिम पोटगी म्हणून रोख रक्कम १५,०००/- दरमहा दोघांकरिता पाहिजे. गैरअर्जदारा हा पोटगी देण्याकरिता सक्षम आहे, ही बाब दाखवण्याकरिता अर्जदाराने तिच्या अर्जामध्ये नमूद केलेले आहे की,गैरअर्जदार हा ग्रामीण कुटा फायनान्स कंपनी बुलढाणा येथे नोकरीस असून त्याला दरमहा ३०,००० /- पगार मिळतो तसेच गैरअर्जदाराकडे संयुक्त कुटुंबाची दोन एकर बागायती शेती मैजे पांग्रा, पो. उमरा, ता. पातुर, जिल्हा. अकोला येथे आहे आणि त्यापासून गैरअर्जदाराला वार्षिक उत्पन्न सुमारे २,०००००/- ते २,५०,०००/- मिळते.

**१५.** गैरअर्जदाराने त्याचा असेट अँड लायबिलिटी चे प्रतिज्ञापत्र निशाणी क्रमांक.१३ वर दाखल केलेला आहे आणि त्यामध्ये नमूद केले की,तो खाजगी नोकरी करतो करतो, त्यापासून त्याला रक्कम रुपये १०,०००\- प्रतिमा मिळते.परंतु गैरअर्जदाराचे असे म्हणणे आहे की, त्याची सर्व पगार त्याच्या व त्या त्याच्या वडिलांच्या आजारामध्ये आणि

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH
Date: 2026.03.16 11:34:53 +0530

पालनपोषण मध्ये खर्च होते म्हणून त्याच्याकडे रक्कम शिल्लक राहत नाही. त्यामुळे तो अर्जदारांना कोणतीही रक्कम देऊ शकत नाही.तसेच त्याच्याकडे शेती नाही.

**१६.** वर नमूद सर्व बाबींचा अवलोकन केल्यानंतर ही बाब दिसून येते की, गैरअर्जदाराकडे उत्पन्नाचे साधन आहे आणि तो खाजगी नोकरी करून दरमहा रक्कम रुपये १०,०००/- मिळवितो. गैरअर्जदाराचे स्वतःचे खर्चे आणि आई-वडिलांची जबाबदारी असेल तरीही, गैरअर्जदाराला तिच्या पत्नी आणि मुलाचे दैनंदिन गरजा पूर्ण करणे बंधनकारक आहे. गैरअर्जदाराला तिची पत्नी व मुलासाठी खर्च देणे बंधनकारक आहे. वर नमूद सर्व बाबींचा विचार केल्यानंतर मी, या मताशी येत आहे की गैरअर्जदार हा अर्जदारांना पोटगी देण्याकरिता सक्षम आहे .अर्जदारांनी अभिलेखावर गैरअर्जदाराकडे शेती असल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे या क्षणी सदरची बाब मान्य करता येणार नाही की, गैरअर्जदाराकडे शेती आहे व त्याच्याकडे शेतीपासून उत्पन्न येतो. गैरअर्जदार तसेच अर्जदारांची परिस्थितीचा अवलोकन करून मी, या मताशी येत आहे की, किमान गैरअर्जदाराने, अर्जदारांना दरमहा रक्कम रुपये ३०००/-दोघांकरिता अंतरिम पोटगी म्हणून दिले पाहिजे.

**१७.** त्याचप्रमाणे खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH Date: 2026.03.16 11:35:00 +0530

१. सदरचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात आला आहे.

२. यान्द्वारे गैरअर्जदार. क्रमांक.१ ला असा आदेश देण्यात येत आहे की, गैरअर्जदाराने, दरमहा अर्जदारांना अंतरिम पोटगी म्हणून रक्कम रुपये ३०००/- दोघांकरिता अर्ज दाखल तारीख म्हणजेच दिनांक १७/०३/२०२५ पासून मूळ अर्ज निकाली लागेपर्यंत देण्यात यावे.

२. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा,२००५,चे कलम २४ अंतर्गत, या अर्जाची निकालाची परत मोफत, या अर्जाचे दोन्ही पक्षकार म्हणजेच अर्जदार तसेच गैरअर्जदार यांना देण्यात यावी.

३. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा,२००५,चे कलम २४ अंतर्गत या अर्जाची निकालाची परत,खामगाव शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदाराला देण्यात यावी.

४. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा,२००५,चे कलम २४ अंतर्गत या अर्जाची निकालाची परत,खामगाव शहरचे संरक्षण अधिकारीला देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH
Date: 2026.03.16 11:35:08 +0530

स्थळ : खामगाव
दिनांक :१६/०३/२०२६

(एफ. टी. शेख)
सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
खामगाव, जिल्हा- बुलढाणा